'साप्ताहिक शब्दरुतू'चे वार्षिक वर्गणीदार होण्यसाठी क्यूआर कोडवर वार्षिक किंवा मासिक योजनांचे पेमेंट करून मो. ९०११२०१४१४ या व्हाट्सअॅप नंबरवर स्क्रिनशॉट व आपला पूर्ण पत्ता पाठवावा.
**वार्षिक वर्गणी : १८० । मासिक वर्गणी : १४**

# शब्दरुतू


पोस्टल परवाना नं. SRP/136/2023-2026
**कार्यकारी संपादक : सुमीत लांडे, मुंबई**
संपर्क : मो. ९०११२०१४१४
Email ID : shabdarutu@gmail.com

### वडोदरा पूल दुर्घटनेत १३ जणांचा मृत्यू


**गांधीनगर :** गुजरातच्या वडोदरा जिल्ह्यात गंभीरा पूल कोसळल्याने मोठी दुर्घटना घडली आहे. ज्यामध्ये पुलावरुन जाणाऱ्या एका ट्रकसह तीन वाहनं थेट नदीत कोसळली आहेत. या दुर्घटनेत १३ जणांचा मृत्यू झाला आहे. तर अनेकजण जखमी झाले आहेत. बचावकार्य अजूनही सुरू असून जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल तीव्र शोक व्यक्त केला आहे आणि मृतांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदतही जाहीर केली आहे.

* वर्ष २ रे * अंक ४१ वा * रविवार दि. १३ जुलै २०२५ (Decl.Regd.No. SR/MAG/11/2021) RNI.NO.MAHMAR/2021/84232 पाने ४ * किंमत ४ रु. साप्ताहिक (Weekly)

**नवी कोरी पुस्तकं**




**बिनचेहऱ्याचे कभिन्न तुकडे**
: लेखकाचे नाव :
**अक्षय शिंपी**
किंमत रु. : २३०/-
: प्रकाशन :
**शब्दालय प्रकाशन**



**कथानायिकांच्या कथा**
: लेखकाचे नाव :
**मधुकर धर्मापुरीकर**
किंमत रु. : ३००/-
: प्रकाशन :
**शब्दालय प्रकाशन**

## हाय रिटर्नचं स्वप्न, नो रिटर्नचा धक्का...!

### सिकंपनीकडून ३०० कोटींचा गंडा




**पारनेर:** सुपा परिसरातील एका कंपनीने शेअर मार्केट आणि परकीय चलनात गुंतवणुकीच्या नावाखाली १२-१५% २५% दरमहा परताव्याचं आमिष दाखवून नगर व पुणे जिल्ह्यातील हजारों गुतवणूक दाराकडून अंदाजे ३३०० कोटी रुपयांची फसवणूक केल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या कंपनीने सुरुवातीला दामहा भरघोस परतावा दिला, मात्र मागील तीन चार महिन्यांपासून कोणताही परतावा मिळालेला नाही. अलीकडेच कार्यालय बंद झाल्यामुळे गुंतवणूकदारांमध्ये मोठा संभ्रम निर्माण झाला आहे.

सुपा येथून सुरू झालेल्या 'मनिमॅक्स', 'सीसपे' आणि 'होस्ट' या तीन कंपन्यांनी उच्च ०० शिक्षित एजंटच्या माध्यमातून गावोगाव ठेवी गोळा केल्या. अनेक गुंतवणूकदारांनी सेवानिवृत्तीचे पैसे, कर्ज, जमीन विकून पैसे गुंतवले. काहींनी तर नातेवाईक आणि मित्रांच्या माध्यमातून गुंतवणूक केल्यामुळे तक्रार करण्यासही धजावत नाहीत.

(पान २ वर)

## खोटे सोने तारण ठेवून लाटले कर्ज, बॅंकेला फटका




> बॅंकेने नेहमीच पारदर्शकपणे काम केले आहे. मात्र, कमलेश अधिकार यांनी खोटे प्रमाणपत्र देऊन बॅंकेचा विश्वासघात केला, यामुळे बॅंकेला मोठा आर्थिक फटका बसला आहे. भविष्यात असे प्रकार टाळण्यासाठी कठोर पावले उचलली जातील.
> **– नवनीत शर्मा, शाखा व्यवस्थापक**

**वैजापूर :** शहरातील स्टेट बैंक ऑफ इंडियाच्या मोदा मार्केट शाखेत नकली सोन्याच्या तारणावर कर्ज घेण्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणात बॅंकेला तब्बल १२ लाख १५ हजार रुपयांचा आर्थिक फटका बसला आहे. बॅंकेच्या शाखा व्यवस्थापकांनी याबाबत वैजापूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, दोन ग्राहक आणि बॅंकेच्या पॅनलवरील सोनारावर कायदेशीर कारवाईची मागणी केली आहे.

नवनीत नारायण शर्मा (वय ४७) हे स्टेट बैंक ऑफ इंडियाच्या वैजापूर शाखेत गेल्या एक वर्षापासून शाखा व्यवस्थापक म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, बैंकत गोल्ड लोनच्या प्रक्रियेसाठी उपव्यवस्थापक दीपांजली जेथे आणि सर्व्हिस मॅनेजर राजीव लक्ष्मण सपकाळ यांची नियुक्ती आहे. याशिवाय, छज्पती संभाजीनगर येथील स्टेट बॅंकेच्या प्रादेशिक कार्यालयाने कमलेश आनंतराव अधिकार यांना गोल्ड लोनसाठी सोन्याची पडताळणी आणि प्रमाणपत्र देण्याचे काम सोपवले आहे. कमलेश गेल्या पाच वर्षापासून सोन्याच्या शुद्धतेची तपासणी करत आहेत.

(पान २ वर)

### शिर्डीसह अनेक जिल्ह्यांतील गुंतवणूकदारांची

## ३०० कोटींची फसवणूक

### मुख्य सूत्रधारास परराज्यातून अटक



**शिर्डी :** एका वर्षात पैसे दुप्पट करण्याचे आणि गुंतवणुकीवर भरघोस मासिक परतावा देण्याचे आमिष दाखवून आणखी एका कंपनीने गुंतवणूकदारांची फसवणूक केल्याचे समजते. 'ग्रो मोअर फायनान्स कंपनी'ने शिर्डीसह अनेक जिल्ह्यांतील शेकडो गुंतवणूकदारांची तब्बल ३०० कोटींहून अधिक रकमेची फसवणूक केल्याची माहिती आहे.

रात्री उशिरा शिर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी मुख्य सूत्रधार भूपेंद्र राजाराम साबळे पाटील याला शहादा येथे अटक झाली असून त्याच्यावर अहिल्यानगर जिल्ह्यातील शिर्डी आणि राहाता येथे देखील गुन्हे दाखल झाले आहेत. शिर्डीत साई संस्थानच्या कर्मचाऱ्यांसह इतरांची १ कोटी ६५ लाख रुपयांची फसवणूक झाल्याचे समोर आलं असून या घोटाळ्याची व्याप्ती वाढण्याची शक्यता आहे. पैसे दुप्पट होण्याच्या आमिषामुळे शेकडो गुंतवणूकदार भुलले आहेत. जवळपास ३०० कोटी रुपयांची

(पान २ वर)

## मोर्चाला परवानगी नाकारणं भोवलं

### मिरा-भाईंदरच्या पोलिस आयुक्तांची उचलबांगडी

**निकेत कौशिक नवे आयुक्त**

**मुंबई :** मिरा भाईंदर पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांची उचलबांगडी करण्यात आलेली आहे. त्यांच्या जागी आयपीएस अधिकारी निकेत कौशिक यांची मिरा भाईंदर- वसई विरार पोलिस आयुक्तपदी वर्णी लावण्यात आलेली आहे.

मिरा भाईंदरमध्ये मराठी अमराठी वाद पेटलेला होता. यादरम्यान तिकडच्या व्यापाऱ्यांनी मोर्चा काढला होता. या मोर्चाला प्रत्युत्तर म्हणून मराठी मोर्चा काढण्याचे ठरलेले होते. यासाठी मनसे, शिवसेना आणि मराठी एकीकरण समितीने पोलीस आयुक्त मधुकर

(पान २ वर)

### मी महाराष्ट्रासाठी मी रक्त सांडलं

**मुंबई :** महाराष्ट्रात गेल्या काही दिवसांपासून मोठ्या प्रमाणावर भाषावादाचे चित्र पाहायला मिळत आहे. विशेषतः मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी हिंदी भाषेवरून वाद सुरू केला आहे. या बादाला उत्तर देत एका माजी कमांडो फोर्स सैनिकाने मनसे अध्यक्षांना प्रश्न विचार केला आहे. या सैनिकाने राज ठाकरेंना उद्देशून महटले आहे की मी उत्तर प्रदेशचा आहे. मी महाराष्ट्रासाठी माझे रक्त सांडले आहे.

(पान २ वर)

## मराठी पत्रांना मराठीतूनच उत्तर

### केंद्रीय गृहमंत्रालयाचा निर्णय; महाराष्ट्रातील भाजपाला दिलासा




**नवी दिल्ली :** मराठी पत्रांना मराठीतच उत्तर देण्याचा अतिशय महत्वपूर्ण निर्णय केंद्रीय गृहमंत्रालयाच्यावतीने घेण्यात आला आहे. केंद्राच्या या निर्णयामुळे महाराष्ट्रात मराठी भाषेच्या मुद्यावरून बॅकफूटवर गेलेल्या भाजपला तूर्तास तरी दिलासा मिळाला आहे.

भाजपकडून या निर्णयाचे स्वागत करण्यात आले. 'मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा घोषित करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने माय मराठीचा अगोदरच गौरव केला आहे. केंद्रीय गृह मंत्रालयाच्या कामकाजात करण्यात येणाऱ्या या क्रांतिकारी बदलाचा प्रत्येक मराठी भाषिक आनंदाने स्वागत करतो आहे, अशा शब्दात भाजप नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा महत्वाचा निर्णय घेतल्याबद्दल पंतप्रधान आणि गृहमंत्र्यांचे आभार मानले. मराठीच्या अस्मितेसाठी आज मीरा-भाईंदर शहरात मराठी जनतेनं आपली प्रचंड ताकद दाखवून दिली. सातत्यानं या मुद्यावरुन माघार घ्यावी लागत असल्यानं राज्यातील भाजप्रणित महायुती सरकार बॅकफूटवर गेलं आहे. मराठी अस्मितेचा मुद्दा सध्या महाराष्ट्रात चांगलाच गाजतो आहे. फडणवीस सरकारनं हिंदी भाषा पहिलीपासून सक्तीची केल्याचा दोन महिन्यांपूर्वी जीआर काढला. त्यानंतर याविरोधात तीव्र प्रतिक्रिया उमटल्या.


(पान २ वर)

### संक्षिप्त

**'उद्धव आणि राज ठाकरे एकत्र येणे हा अमेळ...'**

**मुंबई ।** 'महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे आणि येथे अनेक विद्वान झाले आहेत, ज्यांनी खूप चांगल्या शिकवणी देऊन स्वतःला देवाला समर्पित केले आहे. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांचा हा मेळ अमेळ आहे. तो जास्त काळ टिकणार नाही. तसेच त्याचा महाराष्ट्राच्या राजकारणावर कोणताही परिणाम होणार नाही. आपण हिंदी भाषा कशी थांबवू शकतो? आज मुंबईत बॉलीवूड आहे आणि महाराष्ट्रातील लोक बॉलीवूडच्या कमाईवर जगतात. जर त्यांच्यात हिंमत असेल तर त्यांनी बॉलिवूडला चित्रपट बनवण्यापासून थांबवावे आणि मराठी चित्रपट बनवायला सुरुवात करावी.

## जनसुरक्षा विधेयकाला विधीमंडळात मंजुरी



**मुंबई :** बहुचर्चित जनसुरक्षा विधेयक विधानसभेत आवाजी मतदानाने मंजूर करण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी हे विधेयक विधिमंडळात मांडले. त्यानंतर या विधेयकाला एकमताने मंजुरी देण्यात आली. महाराष्ट्र विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन सुरू आहे. अनेक मुद्यांवरून हे अधिवेशन चर्चेत आहे. विविध प्रश्नांवरून विरोधक सरकारला कोंडीत पकडायचा प्रयत्न करत आहेत. यातच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जनसुरक्षा विधेयक विधानसभेत सादर केले. हे जनसुरक्षा विधेयक विधानसभेत मंजूर झाले आहे.

जनसुरक्षा विधेयक वादात अडकले होते. या विधेयकावर विरोधकानी आक्षेप घेतल्यानंतर चर्चा करण्यासाठी दोन्ही सभागृहांच्या सदस्यांची एक समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीचा अहवाल ९ जुलै रोजी विधानसभा सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आआला. विरोधकांच्या आलेपानंतर या विधेयकात काही बदल करण्यात आले. यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जनसुरक्षा विधेयक विधानसभेत सादर केले. विरोधकांनी सूचवलेले बदल आम्ही केले असून, यावर आता सार्वमत झाले आहे. लोकशाही न मानणाऱ्या संघटनांना संविधानावर आधारित राज्य उलथवून टाकायचे आहे.

(पान २ वर)

## कुणाला गद्दार म्हणतो, बाहेर ये तुला दाखवतो...

### विधानसभेत राडा : मंत्री देसाई-परब यांच्यात जुंपली




**मुंबई :** पुनर्विकास प्रकल्पांसहइतरगृहप्रकल्पांमध्ये मराठी माणसाला प्राधान्यानं घर मिळावं, त्यासाठी ४० टक्केची अट टाकून कायदा आणावा अशी मागणी ठाकरे गटाचे आमदार अनिल परब यांनी केली. सरकार यासाठी कायदा करणार का? मराठी माणसाला न्याय मिळणार का असा प्रश्न त्यांनी विचारला. विधानपरिषदेत या प्रश्नाला राज्याचे मंत्री शंभुराज देसाई यांनी उत्तर दिलं. शंभुराज देसाई हे उत्तर देत असताना मोठा गोंधळ झाला. अनिल परब यांनी शंभुराज देसाई यांना गद्दार म्हटल्यानं वातावरण तापलं. यानंतर देसाई यांनी थेट परब यांना

(पान २ वर)

## शिवरायांचे १२ किल्ले युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत

### रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, खांदेरी, जिंजी



**मुंबई :** महाराष्ट्रासाठी एक अभिमानाची बातमी असून छत्रपती शिवरायांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या १२ किल्यांचा युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समावेश करण्यात आला आहे. त्यामध्ये महाराष्ट्रातील रायगड, प्रतापगड, पन्हाळ्यासह ११ किल्ले आहेत तर तामिळनाडूतील जिंजी या किल्याचा समावेश आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्यांची युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समावेश झाल्याची गोष्ट ही महाराष्ट्रासाठी ऐतिहासिक आणि अभिमानास्पद आहे, असे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. यासाठी त्यांनी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विशेष प्रयत्न केल्याचं म्हटलं. तसेच दोन्ही उपमुख्यमंत्री आणि राज्याचे सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांचे यासाठी सहकार्य लाभल्याचं मुख्यमंत्री म्हणाले. युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत सध्या भारतातील ४२ वारसा स्थळांचा समावेश आहे. त्यापैकी अजिंठा लेणी, वेरुळची लेणी, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई व्हिक्टोरियन अँड आर्ट डेको एन्सेबल आणि एलिफंटा केव्हज या पाच स्थळांचा या आधीच समावेश होता. त्यामध्ये आता मराठा लष्करी भूप्रदेश म्हणून शिवरायांच्या १२ किल्ल्यांचा समावेश आहे. रायगड, प्रतापगड, राजगड, पन्हाळ्यासह राज्यातील ११ किल्ले आणि तामिळनाडूतील एक अशा एकूण १२ किल्यांचा समावेश आहे. या किल्ल्यांचा समावेश व्हावा म्हणून गेल्या वर्षी भारत सरकारने युनेस्कोकडे मागणी केली होती. जागतिक वारसा यादीत समावेश करण्यात आलेले हे सर्व किल्ले सतराव्या शतकात बांधले गेलेले आहेत. हे किल्ले मराठा सैन्याच्या असामान्य लष्करी व्यवस्थेचा आणि अभेद्य तटबंदीचा भक्कम पुरावा आहेत.

## सातबारा कोरा न केल्यास मंत्रालयात घुसणार

### बच्चू कडू यांचा सरकारला इशारा



**अमरावती :** शेतकऱ्यांचा सातबारा कोरा आला पाहिजे, या निर्धाराने भर पावसातही हजारो शेतकऱ्यांनी ७/१२ कोरा कोरा कोरा' यात्रेला पापळ वेधून आक्रमक सुरुवात केली. प्रहार जनशती पक्षाचे अध्यक्ष व माजी मंत्री बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली आजपासून सुरू झालेली ही यात्रा केवळ पदयात्रा नसून, शेतकऱ्यांच्या हकासाठी पुकारलेले निर्णायक आंदोलन आहे. आमच्या मागण्या मान्य कराव्यात, अन्यथा हीच पदयात्रा आम्ही सरकारच्या स्वागतासाठी घेऊन जाऊ, मागण्या मान्य न झाल्यास संपूर्ण महाराष्ट्रभर २ हजार किलोमीटरची पदयात्रा काडू व दोन तारखेला मंत्रालयात घुसू, असा इशारा बच्चू कडू यांनी दिला आहे.

(पान २ वर)

# पैशांनी भरलेली बॅग, हातात सिगारेट अन् संजय शिरसाट!

**मुंबई :** 'मंत्री बाजूला पैशांच्या बंगा घेऊन बसले आहेत', असा आरोप शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी केला होता. संजय राऊतांचा हा दावा आता खरा ठरल्याची चर्चा आहे. कारण संजय शिरसाट यांचा पैशांच्या बंगचा शेजारी बसलेला व्हिडीओ समोर आला आहे. या व्हिडीओमध्ये संजय शिरसाट बेडवर बसून सिगारेट ओडत ते फोनवर बोलत आहेत आणि या बेडाखाली पैशांची मोठी बंग असल्याचे दिसते. संजय शिरसाट याबाबत बोलताना म्हणाले, मी आत्ताच तुमच्या मित्राकडून तो व्हिडिओ पाहिला. व्हिडिओ काय दाखवतोय माझं घर आहे. तुम्ही पाहतायत ते माझं घर आहे. माझं बेडरूम आहे. बेडरूममध्ये मी बसलेले बसलेलो आहे. बाजूला माझा सर्वात लाडका कुत्रा हा माझ्या बेडरूममध्ये आहे. व्हिडीओबद्दल मला आश्चर्य नाही, यात काही गैर नाही, टार्गेट करण्याचा प्रयत्न केला जातोय. एक बॅग ठेवलेली आहे. एवढी मोठी बॅग जर पैशाची ठेवायची असेल तर अलमाऱ्या काय मेल्यात का? या बॅगमध्ये पैसे नाहीत तर कपडे आहेत, असा दावाही संजय शिरसाट यांनी केला आहे.



संजय राऊतांनी आज ठरल्याप्रमाणे भुकण्याचा काम केले. शिंदे साहेब दिल्लीला अमित शाह साहेबाला भेटले व त्यांनी सांगितलं की माझा पक्ष पाहिजे तर विलीन करा. परंतु मला मुख्यमंत्री करा हे सगळ पाहिलं, तर यांना संताजी धनाजी दिसतात का? असा प्रश्न आहे. मुर्खासारखे स्टेटमेंट दिसतात. सकाळी उठलं का एकनाथ शिंदे, दुपारी उठलं का एकनाथ शिंदे, मेळावा असला की एकनाथ शिंदे संध्याकाळी झोपताना एकनाथ शिंदे एवढच संजय राऊत यांचे चात् आहे. गेलेली सत्ता त्यांना स्वस्थ बसू देत नाही, असे संजय शिरसाठ म्हणाले.

### ५० खोक्यांमधील एक खोका आज दिसला

“ गेले दोन-अडीच वर्ष ३३ देशांमध्ये गद्दारीची नोंद घेण्यात आली. ५० खोके एकदम ओके, त्याच्यातील कदाचित एक आज खोका दिसला असेल, हे व्हिडिओ सगळीकडे फिरत आहेत. परवा एक गद्दार आमदार मारामारी करताना दिसला. आज एक खोक्यांसोबत बसले आहेत. ते आता बदलून सांगतील की, तिथे महात्मा गांधी छापलेले बनियन होते, बाकी काही त्यात नव्हते. पण, स्पष्टपणे दिसत आहे. ते कैबिनेट मंत्री आहेत, त्यांच्यावर आरोप आलेले आहेत, हटिल घेण्याचा प्रयत्न, जमीन बळकावण्याचा प्रयत्न, मुख्यमंत्र्यांनी स्वतः उच्चस्तरीय चौकशी देखील लावलेली आहे. पण, प्रश्न असा आहे की, या गैंगचे बॉस प्राप्लाब मिधे कारवाई करणार का?

**- आदित्य ठाकरे**


### 'त्यांची' दया येते...

“ एकनाथ शिंदे हे अमित शाह यांच्याकडे तुम्ही स्थापन केलेला गट (शिवसेना) तुमच्यात (भाजप) विलीन करतो, मला पुन्हा एकदा मुख्यमंत्री करा', हे सांगण्यासाठी गेले होते. मुख्यमंत्री फडणवीस यांची मला दया येते. स्वतः च्या अब्रूचे आणखी किती धिंडवडे ते फक्त पाहात बसणार आहेत? हतबलतेचे दुसरे नाव फडणवीस.

**- खा. संजय राऊत**

# आ. गायकवाड यांच्याकडून कॅन्टीन कर्मचाऱ्याला मारहाण प्रकरण

**मुंबई :** शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी आकाशवाणी आमदारनिवास येथील कैटीनमधील कर्मचाऱ्याला मारहाण केली होती. खराब जेवण दिल्याचा आरोप करत त्यांनी कॅन्टीनमधील कर्मचाऱ्याला मारहाण केली होती. या मारहाणीचा व्हिडीओ देखील व्हायरल झाला होता. व्हिडीओ व्हायरल झाल्यानतर सजय गायकवाड यांच्यावर कारवाई करण्यात यावी, अशी




मागणी विरोधकांकडून सुरू होती. आता संजय गायकवाड याच्यावर मरिन ड्राईव्ह पोलिस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. समाजमाध्यमातील व्हिडिओ आणि पोलीस कर्मचाऱ्याच्या तक्रारीच्या आधारावर अदलपात्र गुन्हा नोंदवण्यात आला आहे. दरम्यान आता या गुन्ह्याची माहिती पोलिसांकडून विधानसभा अध्यक्षाना कळवली जाणार आहे. संक्शन ३५२, ११५ (२) अंतर्गत एनसी दाखल करण्यात आली आहे.

### मला पश्चाताप नाही

“ कुणी सभागृहात मुद्दा उपस्थित केला, तर मुख्यमंत्र्यांना विधानसभेच्या नियमाप्रमाणे बोलावं लागतं त्यांनी त्यांचं कर्तव्य पार पाडलं, आम्ही काय फार मोठे काम केले नाही, की ज्यामुळे सरकार अडचणीत येईल. अशा अदखलपात्र गुन्ह्यात पोलिसांना फिर्यादी होता येत नाही. विरोधकांच्या समाधानासाठी मुख्यमंत्र्यानी ते करायला सांगितलं असेल. मला पश्चाताप नाही. शिंदे साहेब मला फोनवर बोलले, राग कट्रोल करण्याचा सल्ला त्यांनी मला दिला.

**- आ. संजय गायकवाड**

# आता शिक्षकांना २० टक्के वाढीव पगार

**मुंबई :** आझाद मैदानावरील शिक्षकांच्या आंदोलनाला यश मिळालं असून विधिमंडळाचं अधिवेशन संपल्यानंतर विनाअनुदानित शिक्षकांच्या खात्यात २० टक्के वाढीव पगार जमा होईल, असं आश्वासन सरकारनं दिलं आहे. आझाद मैदानात शिक्षकांच्या आंदोलनात जाऊन मंत्री गिरीश महाजन यांनी ही घोषणा केली. इथून पुढे पगाराची तारीख टळणार नाही, असं आश्वासनही त्यांनी दिलं. त्याआधी शिक्षकांच्या शिष्टमंडळानं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची भेट घेतली. चर्चा सकारात्मक झाल्याचं महाजन यांनी सांगितलं. सकाळी शरद पवार आणि उद्धव ठाकरेंनी आझाद मैदानात जाऊन शिक्षकांची भेट घेतली होती.

राज्यातील विनाअनुदानित शिक्षकांना देण्यात आलेल्या आश्वासन सरकारने पूर्ण करावे, शाळांना २० रके टप्प्याटप्प्याने अनुदान यासह इतर मागण्यांसाठी शिक्षकांनी आझाद मैदानावर आंदोलन सुरू केलं आहे. आपल्या मागणीसाठी शिक्षक आक्रमक होताच सरकारने त्यांच्या मागण्या पूर्ण करण्याचं आश्वासन दिलं.

गिरीश महाजन म्हणाले की, १८ तारखेला पावसाळी अधिवेशन संपेल, त्यावेळी तुमच्या खात्यात २० टक्के वाढीव पगार जमा झालेला असेल. मुख्यमंत्री हे शिक्षकांच्या मागण्यांबाबत सकारात्मक आहेत.

पान १ वरून

### हाय रिटर्नचं स्वप्न, नो रिटर्नचा धक्का...!

पारनेर तालुक्यातील सुपा परिसरात सुरू असलेल्या काही ४० उर्जे खासगी कंपन्यांनी शेअर मार्केट व ट्रेडिंगच्या नावाखाली दामदुप्पट किंवा महिन्याला १० ते १५ टक्के परताव्याचे आमिष दाखवून पुणे व नगर जिल्ह्यातील हजारो गुंतवणूकदारांकडून सुमारे ३३०० कोटी रुपयांची फसवणूक केली आहे. या कपन्यांनी सुरुवातीला काही महिन्यांपर्यंत परतावा देत गुंतवणूक वाढवली आणि नंतर अचानक पैसे देणे थांबवले. परिणामी, अनेक गुंतवणूकदारांची रकम अडकून पडली आहे.

### खोटे सोने तारण ठेवून लाटले; कर्ज, बँकेला फटका

बैंकत गोल्ड लोन देण्याची प्रक्रिया अत्यंत काटेकोरपणे राबवली जाते. मे २०२५ मध्ये जेधे यांनी कमलेश अधिकार यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांचा फोन लागत नसल्याने संशय निर्माण झाला, शाखा व्यवस्थापकांनी प्रादेशिक कार्यालयाशी संपर्क साधला असता, बँकेत तारण ठेवलेल्या सोन्याची पुन्हा पडताळणी करण्याचे निर्देश मिळाले. यासाठी प्रादेशिक कार्यालयाने दुसरे सोनार सुमित भगवानराव भागवत (रा. छत्रपती संभाजीनगर) यांना नियुक्त केले. सुमित यांनी ५ जूनला बँकेत ठेवलेल्या सोन्याची तपासणी केली. यावेळी खालील ग्राहकांचे सोने नकली असल्याचे समोर आलेः गोकुळ सुखदेव सोनवणे: ९७.८० ग्रॅम (५ लाख रुपये कर्ज) अनुराधा विलास रणखाबेः ५९.३० ग्रॅम (२ लाख ९० हजार रुपये कर्ज), पवन रमेश शिंदेः ७४.९० ग्रॅम (४ लाख रुपये कर्ज), सरला गोविंद उचितः ८४.९० ग्रॅम (४ लाख ७१ हजार रुपये) आणि ८१.८० ग्रॅम (४ लाख ५४ हजार रुपये) सुमित भागवत यांनी याबाबत लेखी प्रमाणपत्र दिले, त्यामुळे हा घोटाळा उघडकीस आला. ग्राहकाने तारण ठेवलेल्या सोन्याची पडताळणी कमलेश अधिकार यांच्याकडून केली जाते. जेधे यांच्या देखरेखीखाली कर्जाची फाइल तयार होते. शाखा व्यवस्थापक शर्मा यांच्या अंतिम स्वाक्षरीनंतर कर्ज मंजूर केले जाते. कर्जाची रकम ग्राहकाच्या खात्यात जमा झाल्यानंतर, सोन्याच्या मूल्यांकनासाठी सोनाराला २ टक्के फी (किमान १०० रुपये आणि कमाल ६०० रुपये) दिली जाते. ही सर्व प्रक्रिया पारदर्शकपणे पार पड़ने, असे बँकेकडून सांगण्यात आले.१० जानेवारी २०२५ रोजी जेधे याना बँकेच्या अंतर्गत परीक्षेसाठी रजा घ्यावी लागली, त्यांच्या अनुपस्थितीत प्रोबेशनरी अधिकारी आनंद कुमार यांच्याकडे गोल्ड लोनचा अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला, याच काळात गोकुळ सुखदेव सोनवणे (रा. सुदामवाडी, बोरसर, ता. वैजापूर) यांनी १७.८० ग्रॅम सोन्याच्या तारणावर ५ लाख रुपये कर्जासाठी अर्ज केला. आनंद कुमार यांनी ही फाइल शाखा व्यवस्थापक शर्मा यांच्याकडे सादर केली. कमलेश अधिकार यांनी सोन्याची पडताळणी करून ते खरे असल्याचे प्रमाणपत्र दिल्याने कर्ज मंजूर करण्यात आले. त्यानंतर, १३ जानेवारी जेधे यांनी पुन्हा कामावर रुजू होत कार्यभार स्वीकारला, त्यांना सोनवणे यांच्या कर्ज मंजुरीची माहिती देण्यात आली. याचप्रमाणे, २९ जानेवारी ला अनुराधा विलास रणखाचे (रा. जीवनगंगा सोसायटी, वैजापूर) यांनी ५९.३० ग्रॅम सोन्यावर २ लाख ९० हजार रुपये कर्जासाठी अर्ज केला. कमलेश अधिकार यांनी या सोन्याची पडताळणी करून प्रमाणपत्र दिल्याने हे कर्जही मंजूर झाले. पुढे, २५ एप्रिलला पवन स्मेश शिंदे (रा. रोटेगाव, ता. वैजापूर) यांनी ७४.१० ग्रॅम सोन्यावर ४ लाख रुपये आणि ६ मे रोजी सरला गोविंद उचित (रा. एम. जी. रोड, भाजीमंडई, वैजापूर) यांनी ८४.९० ग्रॅम सोन्यावर ४ लाख ७१ हजार रुपये आणि ८१.८० ग्रॅम सोन्यावर ४ लाख ५४ हजार रुपये कर्जासाठी अर्ज केला. या सर्व फायलींवर कमलेश अधिकार यांनी सोन्याची शुद्धता प्रमाणित केल्याने कर्ज मंजूर करण्यात आले.

### ३०० कोटींची फसवणूक

फसवणूक झाल्याचे समोर आले. भूपेंद्र सावळे या इसमाने आपल्या नातेवाईकांच्या मदतीने हा सगळा महाघोटाळा केला आहे. शहादा पोलिसांनी परराज्यातून ताब्यात घेतले आहे. शिर्डीत देखील या महाठगाने अनेकांना वर्षभरात पैसे दुप्पट करण्याचे आमिष दाखवून कोट्यावधींची फसवणूक केली. पोलिसांच्या माहितीनुसार, शिर्डी आणि परिसरातील २१ गुंतवणूकदारांनी आरोपी भूपेंद्र राजाराम सावळे, त्याचे वडील राजाराम भटू सावळे या बापलेकासह पाच जणांवर विविध कलमान्वये गुन्हे दाखल केले आहेत. २१ गुंतवणुकदारांची १ कोटी ६५ लाख रुपयांची फसवणूक झाल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे, पण घोटाळ्याची व्याप्ती वाढण्याची शक्यता आहे.या फसवणुकीत अनेक सामान्य नागरिकांनी आपल्या आयुष्याची पुंजी, काहींनी सेवानिवृत्तीची रक्कम, तर साई संस्थानच्या शेकडो कर्मचाऱ्यांनी कर्मचारी सोसायटीतून कर्ज काढून पैसे गुंतवले होते. मुख्य सूत्रधार भूपेंद्र सावळे याने अत्यंत चालाखीने गुंतवणूकदारांना जाळ्यात ओढले. 'गुन्हा दाखल केल्यास पैसे मिळायला अडचण येईल' असे खोटे सांगून त्याने गुंतवणूकदारांना फेब्रुवारी ते जून या काळात तक्रार करण्यापासून रोखले आणि याच काळात मोठ्या रकमेची विल्हेवाट लावली मात्र आता त्याचे पितळ उघडे पडले आहे. आपल्या कष्टाचे पैसे परत मिळतील, या आशेवर गुंतवणूकदारांचे लक्ष पोलिस तपासाकडे लागले आहे. भूपेंद्र सावळे आणि त्याच्या साथीदारांनी आणखी कुणाची फसवणूक केली असल्यास नागरिकांनी स्वतः पुढे येऊन पोलिसांकडे तक्रार करावी आणि अशा आमिषांना बळी पडू नये, असे आवाहन शिर्डी पोलिस उपाधीक्षक शिरीष वमने यांनी केले आहे.

### मोर्चाला परवानगी नाकारणं भोवलं

पांडे यांच्याकडे यासाठी परवानगी मागितली होती. मात्र त्यांनी या मोर्चाला परवानगी नाकारली. यानंतर राज्य शासनानेच मराठी मोर्चाला परवानगी नाकारल्याचा आरोप विरोधकांनी केला. यावरून फडणवीस सरकारवर जोरदार टीका झाली. मराठी मोर्चाला परवानगी नाकारल्याने राज्य शासनाची प्रतिमा खराब झाल्याने मुख्यमंत्री फडणवीस यांनी मोठा निर्णय घेत मिरा भाईंदरचे पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांची तडकाफडकी बदली करण्याचा निर्णय घेतला.

### मी महाराष्ट्रासाठी मी रक्त सांडलं

मुंबईवर जेव्हा दहशतवादी हल्ला झाला त्यावेळी तुमचे योद्धे कुठे होते? या सैनिकाचे नाव प्रवीण कुमार तेवतिया आहे. २६/११ च्या मुंबई हड्यात प्रवीणने अनेक लोकांचे प्राण वाचवले होते. ताज हॉटेलमधील १५० लोकांना वाचवण्यात त्याने महत्वाची भूमिका बजावली होती. प्रवीण कुमार तेवतिया हे मरीन कमांडो फोर्स (माकोस) मध्ये होते. तर भाषेच्या नावाखाली देशाचे विभाजन करू नका, असंही त्यांनी पुढे मत मांडले आहे.

### मराठी पत्रांना मराठीतूनच उत्तर

याविरोधात सोशल मीडियावर विविध स्तरातले लोक व्यक्त व्हायला लागले. यामध्ये लेखक, विचारवंत, पत्रकार, राजकीय व्यक्ती या सर्वांचा समावेश होता. मोठा दबाव वाढत असल्यानं सरकारनं नंतर या जीआरमध्ये सुधारणा करुन अनिवार्य ऐवजी सर्वसाधारण हा शब्द टाकून पुन्हा दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला.

मुंबई हिंदी भाषिकांनी केलेल्या आंदोलनाला प्रत्युत्तर म्हणून मराठी भाषिकांनी मुंबईत मोर्चा काढला. या मोर्चात सहभागी होण्याचा प्रयत्न करणाऱ्या शिवसेना व मनसे कार्यकर्त्यांची पोलिसांनी पहाटेपासूनच धरपकड केली.. पण त्यानंतर याविरोधात मराठी अभ्यास केंद्राचे अध्यक्ष दीपक पवार आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आक्रमक पवित्रा घेतला. एकीकडं सरकारचा हा निर्णय कसा चुकीचा आहे? हे सामाजिक आणि बालमानशास्त्राच्या दृष्टीनं सांगण्याचा प्रयत्न करत होते. तर दुसरीकडं राज ठाकरे सरकारवर राजकीय दबाव आणण्याचा प्रयत्न करत होते. त्यामुळे सरकारला अखेर दोन्ही जीआर रद्द करण्याची घोषणा करावी लागली. त्यानंतर हे जीआर रद्द झाल्याबद्दल मराठी विजयाचा मेळावा मनसे आणि ठाकरेंची शिवसेना यांनी एकत्रितपणे वरळीत घेतला. या निमित्त दोघे भाऊ आश्चर्यकारकरित्या एकत्रही आले. त्यामुळे दोन्हीकडच्या कार्यकत्यांमध्ये तसंच मराठी जनतेमध्ये उत्साहाचं वातावरण दिसून आलं. त्यानंतर आज मीरा-भाईंदर शहरात मनसे आणि मराठी एकीकरण समितीच्यावतीनं आयोजित मोर्चामध्ये देखील मराठी जनतेनं विक्रमी संख्येनं हजेरी लावली.

### जनसुरक्षा विधेयकाला विधीमंडळात मंजुरी

त्यांच्यावर नियंत्रण आणण्यासाठीच हा कायदा आणत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. दुसरीकडे, या विधेयकाला १२ हजार ५०० सूचना, हरकती आल्या होत्या. त्याचा अभ्यास करून मूळ विधेयकात तीन महत्त्वाचे बदल करण्यात आल्याचे समजते. हा अहवाल सादर होताना कोणतीही डिसेंट नोट नाही. ही अभिमानाची गोष्ट आहे. लोकशाही संघटना असल्याचा नावातून बनाव असला तरी, 'कड़वी डाबी विचारसरणीने प्रेरित होऊन अनेक लोक बंदूका हातात घेऊन व्यवस्थेच्या विरोधात होते. साम्यवादी विचारांचे राज्य उभारण्याचा त्यांचा उद्देश होता. राज्यात नक्षलवादी विचारांचा प्रभाव असलेले ४ जिल्हे होते. आता फक्त २ तालुके उरले आहेत, ते देखील संपतील, सगळ्यात जास्त डाव्या विचारसरणीच्या संघटना महाराष्ट्रात असून, हा आकडा ६४ आहे. कायदा नसल्यामुळे त्यांच्यावर बंदी घालता येत नाही. बाहेरील राज्यांत चंदी असल्यामुळे त्या संघटना महाराष्ट्रातून ऑपरेट करत आहेत. या कायद्यानंतर कुणालाही अटक करता येणार नाही, कायद्याबद्दल गैरसमज पसरवले जातः आहेत.

### कुणाला गद्दार म्हणतो, बाहेर ये तुला दाखवतो...

तू बाहेर ये तुला दाखवतो अशी भाषा वापरली. यामुळे सभागृहाचं कामगाज दहा मिनिटं तहकूब करण्यात आलं.

अनिल परब यांनी विधानपरिषदेत बोलताना म्हटलं की, मराठी माणसाला प्राधान्याने घर मिळायला पाहिजे हा कायदा करा. पीएपी साठी कायदा करता, एससी एसटीसाठी कायदा आहे. नवी रिडेव्हलपमेंट होते, ४० टक्के घरं मराठी माणसाला परवडतील अशी बांधण्यासाठी कायदा करणार का, इच्छा फक्त सभागृहात बाहेर गेलं की बिल्डर्सची दादागिरी सुरू होते.

आता बाहेर काय समस्या आहेत ते सभागृहात सदस्य सांगत असतात. मंत्र्यांनी याबाबत काय कायदा करणार ते सांगावं. कायदा केल्याशिवाय मराठी माणसाला न्याय मिळणार नाही. मराठी माणसाचं लक्ष या अधिवेशनाकडे लागलेलं असतं. तुम्ही यासंदर्भात कायदा करणार का? मराठी माणसाला प्राधान्याने घर देण्यासाठी ४० टक्केची अट टाकून कायदा आणणार का? असा प्रश्न अनिल परब यांनी विचारला.

परब यांच्या प्रश्नाला उत्तर देण्यासाठी मंत्री शंभुराज देसाई उभा राहिले. त्यांनी जी भूमिका परब यांची आहे तीच महायुतीची असल्याचं देसाई यांनी सांगितलं. ते म्हणाले की, मराठी माणसाच्या रक्षणासाठी सरकारची भूमिका आहे. परब साहेबांनी रिडेव्हलपमेंट किंवा इतर जे काही प्रकल्पासंदर्भात ज्या पोटतिडकीनं मराठी भाषिकांसाठी भूमिका मांडली तीच भूमिका महायुतीच्या सरकारची आहे. पण, चित्रा वाघ यांनी प्रश्न विचारला, २०१९ ते २०२२ या काळात असा काही नियम केला होता का? तर त्याला उत्तर दिलं की तेव्हा कायदा झाला नव्हता. महाविकास आघाडी सरकारच्या काळात तुम्ही केलं नाही हे रेकॉर्डवरा येतंय ते ऐकवत नाही का?

### सातबारा कोरा न केल्यास मंत्रालयात घुसणार

देशाचे पहिले कृषीमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जन्मगावी म्हणजेच पापळ येथून सोमवारी सकाळी १० वाजता ही यात्रा निघाली. ही पदयात्रा उंबरडा बाजार, मानकी, वळसा, तिवरी, तुपटाकळी, काळी दौलत, गुंज अशी गाबे पार करत १४ जुलै रोजी चिलगव्हाण येथे स्व. साहेबराव करपे यांच्या स्मृतिस्थळी जाहीर सभेने समाप्त होणार आहे. या यात्रेत शेतकरी, महिलांनी, तरुणांनी, आणि प्रहारच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. यात्रेदरम्यान आंदोलक शेतकऱ्यांनी सरकारवर आणि विशेषतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर थेट टीका केली, करताना सरकारकडून शेतकयांसाठी आश्वासन बच्चू कडू यांनी यापूर्वी अन्नत्याग आंदोलन मिळवले होते. मात्र, त्यानंतर आजपर्यंत कोणतीही ठोस कृती झाली नसल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये प्रचंड असंतोष आहे. कालच आषाढी एकादशीच्या दिवशी मुख्यमंत्री फडणवीस लाखो भाविकांसमोर पंढरपूर येथे उभे होते, पण तिथेही शेतकऱ्यांसाठी एकही शब्द न बोलता निघून गेले, ही शेतकऱ्यांच्या अपमानाची परिसीमा असल्याचे आंदोलक म्हणाले. आम्हाला सरकारची सहानुभूती नको, आम्हाला आमचा अधिकार हवा. सातबारा कोरा झाला नाही, तर आम्ही रस्त्यावर उतरणारच, असा इशाराही आंदोलकांनी दिला.

लाडकी बहीण योजना आणताना कोणतीही समिती न करता सरकारने तातडीने निर्णय घेतला, मग कर्जमाफी आणि ७/१२ कोरा करण्यासाठी समिती कशाला? असा थेट सवाल उपस्थित करत शेतकल्यांनी सरळ सातबारा कोरा संदर्भात घोषणा करण्याची मागणी केली.

# निळवंडेच्या कामांसाठी पाच हजार कोटी

## जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची माहिती

**प्रवरानगर** : जिल्हयातील जिरायती भागाला वरदान ठरलेल्या निळवंडे (ऊर्ध्व प्रवरा) प्रकल्पाच्या उर्वरीत कामांकरिता केंद्र शासनाच्या केंद्रीय जल आयोगाच्या तांत्रिक सल्लागार समितीने ५ हजार २३ कोटी रुपयांच्या निधीस मान्यता दिली असल्याची माहिती जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

### प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात

जल आयोगाच्या तांत्रिक सल्लागार समितीची १५९ वी बैठक केंद्रीय जलसंसाधन मंत्रालयाच्या सचिवांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीत निळवंडे प्रकल्पाच्या उर्वरीत कामांसाठी निधी उपलब्ध होण्याकरिता केंद्रीय जल आयोगाच्या तांत्रिक सल्लागार समितीची मान्यता मिळणे गरजेचे होते. या

### ६८ हजार हेक्टर क्षेत्रास सिंचन लाभ

प्रकल्पामुळे अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले, संगमनेर, राहता, कोपरगाव, राहुरी तालुक्यातील आणि नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यातील एकूण ६८ हजार हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे. जमंत्री विखे पाटील यांनी यासाठी व्यक्तिगत पाठपुरावा केला होता.



केंद्रीय समितीच्या मान्यतेमुळे निळवंडे प्रकल्पास केंद्र सरकारकडूनही निधी उपलब्धतेचा मार्ग मोकळा आहे. सुमारे ५ हजार २३ कोटी रूपयांच्या निधीस मान्यता मिळाल्याने कालव्याच्या उर्वरित कामांना निधी उपलब्ध होणार असल्याचे मंत्री विखे यांनी सांगितले. सन १९७० मध्ये सुरू झालेल्या या प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात आले असून, प्रकल्पाचा अपेक्षित लाभ शेतकऱ्यांना मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या प्रकल्पामध्ये निळवंडे धरण, ७० किलोमीटर लांबीचा उजवा कालवा आणि ८५ किलोमीटर लांबीचा डावा कालवा असून वर्षाला १०.५ टीएमसी पाण्याचा वापर होणार आहे. विशेषतः लाभक्षेत्रातील शेवटच्या गावाला पाणी देण्याच्या दृष्टीने विभागाने सर्व नियोजन केले आहे.

# मी कोणाचं काही ऐकलं नाही म्हणून माझ्यावर ईडी : पवार



**अहिल्यानगर** : महाराष्ट्र राज्य सहकारी बँक घोटाळयात अंमलबजावणी संचालनालयाने राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) आमदार रोहित पवार आणि काही इतरांविरुद्ध पुरवणी आरोपपत्र दाखल केले आहे. यावर रोहित पवार यांनी प्रतिक्रिया दिली. 'कुणाचं आणि काय ऐकलं नाही म्हणून माझ्याविरोधात ईडी ने कारवाई केली हे जगजाहीर आहे, याबाबत अधिक सांगण्याची गरज नाही, दोषारोप पत्र दाखल झाले आता न्यायालयात दूध का दूध आणि पाणी का पाणी होईल, असा विश्वास आमदार रोहित पवार यांनी व्यक्त केला. राज्यामध्ये सध्या विधीमंडळाचे पावसाळी अधिवेशन सुरु झाले आहे. यामध्ये सत्ताधारी आणि विरोधातील नेत्यांना ईडीच्या नोटीस येण्यास सुरुवात झाली आहे. शिंदे गटाचे नेते संजय शिरसाट यांना ईडीची नोटीस आलेली असताना आता रोहित पवार यांच्या देखील पाठीशी ईडीचा ससेमिरा वाढला आहे.

# इंधन पुरवठ्याचे स्विच बंद केल्यामुळे विमान अपघात?

**अहमदाबाद** : गुजरातमधील अहमदाबादमध्ये १२ जून रोजी झालेल्या एअर इंडियाच्या विमान अपघाताचा प्राथमिक अहवाल समोर आला आहे. एअरक्राफ्ट ॲक्सिडेंट इन्व्हेस्टिगेशन ब्युरोच्या अहवालात अनेक धक्कादायक खुलासे झाले आहेत. विमान टेकऑफ केल्यानंतर काही सेकंदातच कोसळले. याचे एक महत्त्वाचे कारण दोन्ही इंजिन बंद पडणे होते. आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे विमानाने आवश्यक उंची गाठली होती, परंतु त्यानंतर दोन्ही इंजिने 'रन' मोडवरून 'कटऑफ' मोडवर गेली. कॉकपिटच्या व्हॉइस रेकॉर्डिंगमध्ये अपघाताच्या काही क्षणांपूर्वी एक पायलट दुसऱ्याला विचारतो, तु इंजिन कटऑफ का केलंस?, त्यावर मी काहीही केलं नाहीय, असं दुसरा पायलट उत्तर देतो. दोन्ही पायलट्समधील हे संभाषणाचा उल्लेख प्राथमिक चौकशीच्या अहवालामध्ये करण्यात आला आहे. अहमदाबाद येथील विमानतळावरून उड्डाण केल्यावर विमानाच्या इंजिनांना होणाऱ्या इंधनाच्या पुरवठ्यावर नियंत्रण ठेवणारे स्विच बंद केले गेले होते. विमानाने उड्डाण केल्यानंतर काही क्षणातच इंजिनामधील थ्रस्ट संपुष्टात आलं आणि विमान खाली कोसळल्याचं समोर आलं आहे.

# राज्यात लवकरच 'मेगा भरती' : मुख्यमंत्री

**मुंबई** : राज्यातील विविध सरकारी विभागांमधील आले असून, त्यानंतरच रिक्त पदांची अचूक माहिती समोर येणार आहे. पदांची भरती लवकरच करण्यात येणार असून, यासाठी 'मेगा भरती' जाहीर होणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली. सर्व विभागांना १५० दिवसांत उद्दिष्टपूर्तीचे आदेश देण्यात आले आहे.

मुख्यमंत्री म्हणाले, पूर्वी जाहीर केलेल्या हजार पदभरती कार्यक्रमाअंतर्गत एक लाखांहून अधिक भरती पूर्ण झाली आहे. अनुसूचित जमाती प्रवर्गातील ६.८६० पदांवर कार्यरत कर्मचारी जात वैधता सादर न करू शकल्यामुळे ही पदे 'अधिसंख्य' मानण्यात आली आहेत.

या कर्मचाऱ्यांना पदावरून हटवले जाणार नाही, मात्र त्यांना बढती मिळणार नाही, रिक्त झालेल्या १३४३ पदांवर भरती पूर्ण झाली असून उर्वरित भरती प्रक्रिया सुरू आहे, अशी माहिती देण्यात आली.




**महत्वाचे मुद्दे :**

१५० दिवसांत सर्व विभागांनी उद्दिष्टपूर्ती करायची.

रिक्त पदांवर आधारित 'मेगा भरती' जाहीर होणार. अनुसूचित जमातींमधील पदभरतीवर विशेष भर. ब्लॉकचेन तंत्रज्ञानाने जात वैधता प्रक्रियेत वेग, सफाई कर्मचाऱ्यांच्या भरतीसाठी वारसा तत्वानुसार संधी.

**अन्य महत्त्वाचे निर्णय**

१. सफाई कामगारांच्या पदांवरील न्यायालयीन स्थगिती हटली, आता वारसा हक्काने भरती शक्य.

२. लाड-पागे समितीच्या शिफारशीप्रमाणे ही प्रक्रिया राबवली जाणार.

३. सार्वजनिक बांधकाम विभागातील अनुसूचित जमातींच्या पदासाठीही भरती लवकरच होणार.

## महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद यांच्या पत्रानुसार राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे यांच्यातर्फे निवडण्यात आलेली नगरपालिका व जिल्हापरिषद शाळेंसाठी निवडक वाचनीय पुस्तकांची यांदी

| अ.नं. | पुस्तकाचे नाव | लेखक | किंमत |
|---|---|---|---|
| १ | गोष्ट कॉम्प्युटरची | संदीप लांडे | 100 |
| २ | जलऊर्जा | संदीप लांडे | 130 |
| ३ | अंतराळ- २ | संदीप लांडे | 150 |
| ४ | रोमांचकारी सफर | सौ.संज्योत बानुबाकोडे | 100 |
| ५ | पेरणी | आबा गोविंदा महाजन | 100 |
| ६ | हिऱ्यांची पिशवी | संज्योत बनूबकोडे | 100 |
| ७ | करामती प्रकाश | विजय नागरे | 150 |
| ८ | अद्भूताचा शोध | विजय नागरे | 130 |
| ९ | जग बदलणारे ५० शोध | आनंद वाघ | 120 |
| १० | घाबरलेल्या सुषमाची गोष्ट | सुमति लांडे | 130 |
| ११ | प्राणी गायब होऊ लागले | आबा गोविंदा महाजन | 150 |
| १२ | बोधकथा | मृण्मयी पाटील | 100 |
| १३ | संवेदना आणि इतर कथा | बाळ पोतदार | 110 |
| १४ | पीठाचा माठ | संतोष खेडलेकर | 100 |
| १५ | आनंदी गाणी | स्नेहा पाटील | 100 |
| १६ | मुलांसाठी शोर्यकथा | संतोष खेडलेकर | 110 |
| १७ | बिल्लू | श्यामला एस. | 100 |
| १८ | करामती मुंग्या | संज्योत बनूबकोडे | 100 |
| १९ | जलधारा | मृण्मयी पाटील | 100 |
| २० | अशी मोडली खोड | मृण्मयी पाटील | 100 |
| २१ | निसर्ग माझा सवंगडी | संदीप लांडे | 100 |
| २२ | पवन ऊर्जा | संदीप लांडे | 130 |
| २३ | निसर्गाचे संवर्धन का करावे | संदीप लांडे | 200 |
| २४ | सौर ऊर्जा | संदीप लांडे | 130 |
| २५ | शाळा सवंगडी | विजय नागरे | 130 |
| २६ | आमची शाळा | विजय नागरे | 130 |
| २७ | कौशल्य | विजय नागरे | 100 |
| २८ | इवलासा ससा | संज्योत बनूबकोडे | 100 |
| २९ | स्वातंत्र्यसंग्रामाच्या शौर्यकथा | संतोष खेडलेकर | 100 |
| ३० | पिंकू आणि सोनू | श्यामला एस. | 100 |
| ३१ | महानायक | संतोष खेडलेकर | 100 |
| ३२ | संस्कार कथामाला | संज्योत बनूबकोडे | 100 |
| ३३ | देण्याचा आनंद | संज्योत बनूबकोडे | 100 |
| ३४ | सफर जगातल्या आश्चर्याची | संतोष खेडलेकर | 120 |
| ३५ | किलबिल गोष्टी | नामदेव माळी | 150 |
| ३६ | हिम्मत | विजय नागरे | 150 |
| ३७ | बी ची गोष्ट | सुनील भोडगे | 100 |
| ३८ | दोरीची करामत | विजय नांगरे | 100 |
| ३९ | ऐतिहासिक शौर्यकथा | संतोष खेडलेकर | 130 |
| ४० | चांगला मित्र | सौ.संज्योत बानुबाकोडे | 100 |
| ४१ | सईचे पंख | विजय नागरे | 150 |
| ४२ | मी अब्दुल कलाम | मृण्मयी पाटील | 100 |
| ४३ | पाण्याविषयी सर्वकाही | संदीप लांडे | 100 |
| ४४ | नाच रे मोरा | सूचित पाटील | 100 |
| ४५ | कावळा काळा कसा झाला | श्यामला एस. | 100 |
| ४६ | रोबोट माझा मित्र | विशाल तायडे | 160 |
| ४७ | उद्धट नंदू | श्यामला एस. | 100 |
| ४८ | झाडाची गोष्ट | शाल्मल लांडे | 100 |
| ४९ | चला पावसाच्या पाण्याची बचत करू | संदीप लांडे | 130 |
| ५० | कचरा व्यवस्थापन | संदीप लांडे | 200 |
| ५१ | हूशार बकरी | बाळ पोतदार | 100 |
| ५२ | आपले हरित घर | संदीप लांडे | 100 |
| ५३ | आपली हरित शाळा | संदीप लांडे | 100 |

| | | | |
|---|---|---|---|
| ५४ | मालगुंडचा सिद्धू | आनंद वाघ | 100 |
| ५५ | अद्भुत पोषोख | विजय नांगरे | 160 |
| ५६ | सातपुड्याच्या जंगलामध्ये | आबा गोविंदा महाजन | 100 |
| ५७ | रणरागिणींच्या शौर्यकथा | संतोष खेडलेकर | 100 |
| ५८ | बबलू खरेदीला जातो | श्यामला एस. | 100 |
| ५९ | चिंटू नावाचा कोल्हा | श्यामला एस. | 100 |
| ६० | दोन जादूगार | रमेश महाले | 100 |
| ६१ | हरवलेला धबधबा | श्यामला एस. | 100 |
| ६२ | चतुर कोल्हा वेंधळा बोकड | मृण्मयी पाटील | 100 |
| ६३ | दिनेशची समुद्र किनाऱ्यावरील सफर | श्यामला एस. | 100 |
| ६४ | प्राणीसृष्टी भाग-१ | रमेश महाले | 200 |
| ६५ | कागा आणि नारळ | श्यामला एस. | 100 |
| ६६ | दिशा नवोपक्रमाची | ताई पवार | 160 |
| ६७ | नशिबाची साथ | विजय नागरे | 100 |
| ६८ | वृक्षगान | लैला महाजन | 100 |
| ६९ | वृक्षवल्ली आम्हा सोयरे | लीलावती भागवत | 100 |
| ७० | म्हणींचा शोध मनास बोध | म.ना. जोशी | 100 |
| ७१ | एकमेका सहाय्य करू | म.ना. जोशी | 100 |
| ७२ | राजा पिल्लाची गोष्ट | लीलावती भागवत | 100 |
| ७३ | छान छान गोष्टी | रोहिणी कुलकर्णी | 100 |
| ७४ | बछडा | मुकुंद निगवेकर | 100 |
| ७५ | संस्कार गोष्टी | म.ना. जोशी | 100 |
| ७६ | सुबोध कथा | मीरा जाधव | 100 |
| ७७ | उपेक्षित बालके | म.ना. जोशी | 100 |
| ७८ | चोरीची माया | बबन खंडगळे | 100 |
| ७९ | गोष्ट राम्पुरीची | बबन खंडगळे | 100 |
| ८० | टीमटीमणारे तारे | स्नेहलता बावळे | 100 |
| ८१ | १११ बोधकथा | हेमंत गोखले | 100 |
| ८२ | सृष्टीशी जडवू नाते | लीलावती भागवत | 100 |
| ८३ | आदर्श गोष्टी | शोभा जोशी | 100 |
| ८४ | अशीही दिवाळी | वर्षा गडकर | 100 |
| ८५ | स्वप्नाचा पाठपुरावा | वर्षा गडकर | 100 |
| ८६ | म्हणीच्या बोधकथा | म.ना. जोशी | 100 |
| ८७ | मजेदार मज्जा | स्नेहलता बावळे | 100 |
| ८८ | व्यंगावर मात | वर्षा गडकर | 100 |
| ८९ | धाडसी आजी | वर्षा गडकर | 100 |
| ९० | आपले पक्षी-सखे सोबती भाग १ | मंगेश कश्यप | 100 |
| ९१ | आपले पक्षी-सखे सोबती भाग २ | मंगेश कश्यप | 100 |
| ९२ | आपले पक्षी-सखे सोबती भाग ३ | मंगेश कश्यप | 100 |
| ९३ | छोट्यांसाठी मोठ्या गोष्टी | वर्षा गडकर | 100 |
| ९४ | सुसंस्कारीत मनोबल | शोभा जोशी | 100 |
| ९५ | मुल नव्हे देवदूतच | नीला कदम | 100 |
| ९६ | वसा स्वावलंबनाचा | शोभा जोशी | 100 |
| ९७ | गुडबाय छोट्या मित्रा आणि इतर गोष्टी | विनया साठे | 100 |
| ९८ | एक झाड लावू मित्रा | अनंत भावे | 100 |
| ९९ | गोष्टीरूप चाणक्य | राजेंद्र खरे | 150 |
| १०० | माणुसकीचा श्वास | नीला कदम | 100 |
| १०१ | पोषक गोष्टी भाग १ | शोभा जोशी | 100 |
| १०२ | पोषक गोष्टी भाग २ | शोभा जोशी | 100 |
| १०३ | विचार यशाचाच | वर्षा गडकर | 100 |
| १०४ | खरी कमाई | शोभा जोशी | 100 |
| १०५ | नातं | वर्षा गडकर | 100 |
| १०६ | बाल रक्षक कायद्याचे | अविनाश भोंडवे | 100 |

**वरील पुस्तके मागविण्यासाठी समोरील नंबरवर संपर्क करा - मो. ९०११२०१४१४/९८२२५२५४४४**

# ईगा स्वियातेक ठरली विम्बल्डनची विजेती



मुंबई : फायनलमध्ये खेळ असावा तर कसा, याचा उत्तम वस्तुपाठ ईगा स्वियातेकने शनिवारी दाखवून दिला. शनिवारी विम्बल्डन ग्रँडस्लॅम टेनिस स्पर्धेत महिलाच्या एकेरी विभागाची फायनल झाली, त्यावेळी ईगाने प्रतिस्पर्धी खेळाडूला एक गुणदेखील जिंकू दिला नाही आणि तिने विम्बल्डन स्पर्धेतील अव्वल विक्रम आपल्या नावावर केला. ईगा स्वियातेकने शनिवारी विम्बल्डन ग्रँडस्लॅम टेनिस स्पर्धेत महिला एकेरीचे जेतेपद पटकावले. अंतिम फेरीत तिने अवघ्या ५७ मिनिटांत अमेरिकेच्या अमांडा अनिसिमोव्हा हिचा ६-०, ६-० असा धुव्वा उडवत प्रथमच या जेतेपदावर नाव कोरले.

स्पर्धेच्या इतिहासात प्रथमच एखादा अंतिम सामना एवढा एकतर्फी झाला. १९११नंतर पहिल्यांदाच एखाद्या खेळाडूने एकही गेम न गमावता जेतेपद पडकावले.

ग्रँडस्लॅम स्पर्धांच्या इतिहासातही असा योग १९८८नंतर जुळून आला. त्यावेळी स्टेफी ग्राफने नताली झ्वेरेव्हा हिला फ्रेंच ग्रँडस्लॅममध्ये नमवताना एकही गेम गमावला नव्हता. फक्त फायनलच नव्हे, तर स्वियातेकने आपल्या अंतिम फेरीपर्यंतच्या प्रवासात दमदार कामगिरी केली. तिने या प्रवासात फक्त एकदाच सेट गमावला हे विशेष.

'जेतेपद अन् तेही असे... याची कल्पनाही केली नव्हती. कारण या स्पर्धेतील माझी आधीची कामगिरी साजेशी झालीच नव्हती. फ्रेंच आणि अमेरिकन अशा दोन ग्रँडस्लॅममध्ये बाजी मारल्यानंतर माझ्या गाठीशी बऱ्यापैकी अनुभव जमा झाला आहे, असे मला वाटले होते, पण विम्बल्डन जिंकण्याचा आनंद एवढा मोठ्ठा असेल, याची अपेक्षा मात्र मी केली नव्हती', असे ईगा म्हणाली.

स्वियातेकने फ्रेंच ग्रँडस्लॅम स्पर्धा चारवेळा जिंकली असून अमेरिकन ग्रँडस्लॅम तिने एकदा जिंकली आहे. एकतर्फी पराभवामुळे अमांडाला सहाजिकच भावना अनावर झाल्या. तिला रडू कोसळले, पण खिलाडूवृत्तीने ईगाने आपल्या या प्रतिस्पर्धीला सावरून घेतले. 'अमांडा आज काहीही घडले असू देत... पण गेले दोन आठवडे दमदार कामगिरी करूनच तू इथवर आलीस हे विसरू नकोस. आजचा दिवस कदाचीत तुझा नसेल, पण म्हणून तुझे गुण, कौशल्य, हुशारी यामुळे तसूभरही कमी होणार नाही', असे ईगा म्हणाली.

साप्ताहिक शब्दरुतू - हे पत्र मालक, प्रकाशक सुमती साईनाथ लांडे यांना मुद्रक विजय दत्तात्रय नगरकर यांनी आदित्य प्रिंटर्स, कामगार सदन, क्रॉस मेनरोड, श्रीरामपूर-४१३७०९, जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून शब्दालय प्रकाशन, पोस्ट बॉक्स नं.९०, वार्ड नं.७, आयडीया टॉवरजवळ, श्रीरामपूर ४१३७०९, जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक- सुमती साईनाथ लांडे
Total Code - SR.NO./MAG/11/2021